MHAM180022182016

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०३.१०.२०१६ |
| नोंदणी तारीख | : | ०३.१०.२०१६ |
| निकाल तारीख | : | २०.०८.२०२६ |
| कालावधी | : | व. म. दि.<br>०९ १० १७ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग वरूड, ता. वरूड जि. अमरावती**
**यांच्या न्यायालयात**

**( पीठासीन अधिकारी व्ही.व्ही. राजूरकर )**

**सं.फौ.ख.क्र. ९८६/२०१६** **निशाणी क्र. २०**

गुन्हा क्रमांक ९९/२०१६ **भारतीय दंड विधान कलम २७९ व ३३७** व **मोटार वाहन कायदा कलम १८१** व **१३४** अन्वये पोलीस स्टेशन, शे.घाट, ता. वरूड जि. अमरावती.

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, शेंदुरजनाघाट,<br>ता. वरूड, जि. अमरावती. |
| **सरकार पक्षातर्फे** | : | श्री. के.एम. पंचगडे, सरकारी वकील, |
| **आरोपी** | | **विजय वसंतराव काळे**,<br>वय – ३० वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>रा. प्रभात स्कुल जवळ, पुसला,<br>ता. वरूड जि. अमरावती. |
| **आरोपी तर्फे वकील** | : | श्री. पी.एल. वानखडे. |

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १०.०३.२०१६ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २२.०३.२०१६ |
| दोषारोपत्र दाखल तारीख | २९.०९.२०१६ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र निश्चित तारीख | ०४.०९.२०२५ |
| पुरावा सुरू झाला ती तारीख | १९.०१.२०२६ |
| प्रकरण न्याय निर्णयाकरिता ठेवले ती तारीख | २०.०८.२०२६ |
| न्याय निर्णयाची तारीख | २०.०८.२०२६ |
| शिक्षेची तारीख व इतर काही | ... |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोप मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ सी.आर.पी प्रमाणे शिक्षेमधून सूट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | विजय वसंतराव काळे. | १०.०६. २०१६. | १०.०६. २०१६. | भा.दं.वि. कलम २७९ व ३३७ व मोटार वाहन कायदा कलम १८१ व १३४ अन्वये. | निर्दोष | .... | .... |

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची नांवे

| | | |
|---|---|---|
| सा.क्र.१ | अमोल वासुदेवरावजी काळे, **नि.क्र.१६** | साक्षीदार |
| सा.क्र.२ | भोजराज अशोकरावजी राऊत, **नि.क्र.१८** | साक्षीदार |

## निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या दस्तांची यादी

| अ.क्र. | विवरण | निशाणी |
|---|---|---|
| | निरंक | |

## आरोपी पक्षातर्फे साक्षीदारांची नांवे

| |
|---|
| निरंक |

**आरोपी पक्षातर्फे दस्तांची यादी**

| निरंक |
|---|

**न्यायनिर्णय**

**(दिनांक २०.०८.२०२६ रोजी घोषित)**

आरोपीविरुद्ध प्रस्तुत खटला **भारतीय दंड विधान कलम २७९ व ३३७** व **मोटार वाहन कायदा कलम १८१** व **१३४** अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात पुढील प्रमाणे :–**

**०२.** दिनांक १०.०३.२०१६ रोजी तक्रारदार त्याचे ढाब्यावर हजर असताना रात्री ०८.३० ते ०९.०० च्या दरम्यान त्याला एका अनोळखी इसम पायदळ रोड ओलांडुन येत असताना दिसला. त्यावेळी सदर रोडवर एक होंडा कंपनीची मोटारसायकल ज्यावर तिघेजण बसलेले होते ते वरूड वरून सदर मोटारसायकलवर भरधाव वेगात व निष्काळजीपणाने आले व सदर अनोळखी इसमाला त्यांनी धडक दिली. अपघात झाल्यामुळे तक्रारदार घटनास्थळावर गेला. मोटारसायकलवर बसलेले दोघेजण जखमी झाले होते. त्यांना एका ऑटोने वरूड सरकारी दवाखान्यात पाठविण्यात आले. पायदळ चालणारा इसम व मोटारसायकलवरील दोघेजण यांना दवाखान्यात भरती करण्यात आले. त्यापैकी मोटारसायकलस्वारापैकी एकाचे नाव विजय काळे रा. पुसला असे असल्याचे समजले. तो इसम बेशुद्ध होता. त्यानंतर त्या तिघांना रुग्णवाहिकेने अमरावती येथे रेफर करण्यात आले. त्यानंतर तक्रारदाराने सदर फिर्याद मोटारसायकलस्वार विजय काळे याच्या विरुद्ध दिली होती.

०३. सदर तक्रारीवरून आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे, शे.घाट, ता. वरूड येथे गुन्हा क्रमांक ९९/२०१६ नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पो.हवा. रमणलाल जयस्वाल यांनी केला. तपासा दरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा तयार केला व तपासाअंती आरोपीविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

०४. आरोपीविरुद्ध **नि.क्र.१६** वर भारतीय दंड विधान कलम २७९ व ३३७ व मोटार वाहन कायदा कलम १८१ व १३४ अन्वये दोषारोप ठेवला. सदर दोषारोप आरोपीला समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे नमूद करून संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

०५. आरोपीविरुद्ध पटलावर पुरावा न आल्यामुळे त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०६. खालील मुद्दे परामर्श करण्याकरिता माझे समक्ष उपस्थित होतात. त्यावरील कारणमीमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| **१.** | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दिनांक १०.०३.२०१६ रोजी रात्री ०८:०० ते ०९:०० वाजेच्या दरम्यान जय भोले ढाबा धनोडी समोर आरोपीने त्याचे ताब्यातील मोटारसायकल जिचा क्र. एम.एच.२७–ए.बी.–१६८३ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने सार्वजनिक रस्त्यावर चालविली ? | **नाही.** |

| | |
|---|---|
| २. अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र. एम.एच.२७-ए.बी.-१६८३ भरधाव वेगाने चालवून रोडवर पायदळ चालणाऱ्या इसमाला धडक देऊन जखमी केले ? | **नाही.** |
| ३. अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल विना परवाना सार्वजनिक रस्त्यावर चालविली ? | **नाही.** |
| ४. अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल सार्वजनिक रस्त्यावर चालवून रस्त्यावर चालणाऱ्या इसमाला ठोस मारून त्याला खाली पाडले व त्याला कोणतीही मदत न करता तो मोटारसायकलवर तेथुन पळुन गेला ? | **नाही.** |
| ५. कोणता गुन्हा सिद्ध होतो काय ? | **नाही.** |
| ६. आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. ०१ ते ०४ करिता :-**

०७. वरील सर्व मुद्दयांवरील पुरावे एकसारखे असल्यामुळे त्यावरील विवेचन एकत्रितपणे करण्यात येते. अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपीने घटनेच्या दिवशी त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र.एम.एच.२७-ए.बी.-१६८३ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने सार्वजनिक रस्त्यावर विना परवाना चालवून रस्त्यावर चालणाऱ्या इसमाला ठोस मारून त्याला जखमी केले व त्याला कोणतीही मदत न

करता आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. सदर बाब सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने एकूण दोन घटनास्थळावरील साक्षीदार तपासले. तक्रारदार प्रशांत गणोरकर याला साक्षकामी हजर ठेवण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला. त्यामुळे तक्रारदाराची साक्ष नोंदविण्यात आली नाही. तसेच अभियोग पक्षाने इतर महत्त्वाचे साक्षीदार सुद्धा साक्षकामी हजर ठेवले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करून प्रकरण पुढे चालविण्यात आले.

०८. अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०१ **अमोल वासुदेवरावजी काळे**, याने पुराव्यात नमुद केले की, तो आरोपीला ओळखतो. घटनेच्या दिवशी सदर साक्षीदार कामावरून येत असताना त्याला एक जण दारू पिऊन त्यांना आडवा आला व त्यामुळे सदर साक्षीदार व त्याच्या सोबत असलेले इसम खाली पडले. सदर साक्षीदार मोटारसायकलवर होता व त्याच्या सोबत आरोपी देखील होता. त्यावेळी सदर साक्षीदाराला व आरोपीला देखील सदर अपघातामध्ये लागले होते व त्यामुळे ते दोघे जण सरकारी दवाखान्यात गेले होते. सदर घटना धनोडी जवळ वरूड रोडवर घडली होती. पोलिसांनी त्यांचे बयाण नोंदविले नव्हते व चौकशी देखील केली नव्हती. सदर आडवा आलेला इसमाला ओळखत नसल्याचे तसेच याव्यतिरिक्त सदर घटनेबाबत त्याला काहीही माहीत नसल्याचे सा.क्र.०१ नमुद करतो. सदर साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करत नसल्यामुळे त्याला सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतु त्यानंतरही सा.क्र.०१ याने आरोपी याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात सार्वजनिक रस्त्यावर चालविले होते व त्याच्यामुळे सदर अपघात झाला होता असे कुठेही नमुद केलेले नाही. त्याचे बयाणातील व पुरवणी जबाबातील अधोरेखांकित **भाग 'अ'** हा चुकीचा असल्याचे सा.क्र.०१ नमुद करतो. त्यामुळे सा.क्र.०१ याच्या पुराव्यात आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणाने

चालविले होते व त्यामुळे सदर अपघात झाला होता असे कुठेही आलेले नाही.

०९. यानंतर अभियोग पक्षाने **भोजराज अशोकरावजी राऊत** यांना सा.क्र.०२ म्हणून तपासले. त्यांनी पुराव्यात नमुद केले की, ते आरोपीला ओळखतात. घटना काय घडली हे त्यांना माहीत नाही. सदर अपघात हा दहा वर्षापूर्वी झाला होता परंतु तो कुठे व कसा झाला होता व त्यामध्ये कोणा–कोणाला लागले होते याबाबत त्यांना काहीही माहीत नसल्याचे सा.क्र.०२ नमुद करतो. पोलिसांनी त्याची चौकशी केली नव्हती तसेच त्याचे बयाण नोंदविले नव्हते असे सा.क्र.०२ नमुद करतो. सा.क्र.०२ याने देखील अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही त्यामुळे त्याला देखील सुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्यामध्येही सा.क्र.०२ ने त्याला सदर घटनेबाबत काहीही माहीत नसल्याचे नमुद केले आहे. धनोडी फाट्याजवळ आरोपी विजयने एका माणसाला उडविले होते व त्यामुळे त्याला लागले होते असे काहीही माहीत नसल्याचे सा.क्र.०२ नमुद करतो. सदर अपघात हा आरोपी विजयच्या चुकीमुळे झाला होता याबाबत त्याला काहीही माहीत नसल्याचे सा.क्र.०२ नमुद करतो. सा.क्र.०२ याला त्याचे बयाणातील अधोरेखांकित **भाग 'अ'** वाचुन दाखविला परंतु तो बरोबर नसल्याचे तो नमुद करतो. तसेच पोलिसांनी सदर मजकुर त्याचे बयाणामध्ये का लिहिला याचे कारण तो सांगू शकत नसल्याचे नमुद करतो.

१०. सा.क्र.०१ व सा.क्र.०२ यांचे पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, त्या दोघांनीही त्यांच्या पुराव्यात आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणाने सार्वजनिक रस्त्यावर विना परवाना चालवुन रस्त्यावरील पायी चालणाऱ्या इसमाला त्याने धडक दिली व त्याला जखमी केले ही

बाब कुठेही आलेली नाही. त्यामुळे आरोपीवर लावण्यात आलेले कोणतेही आरोप अभियोग पक्षाने तपासलेल्या दोन्ही साक्षीदारांच्या पुराव्यात आलेले नाहीत. अभियोग पक्षाने इतर कोणताही महत्त्वाचा साक्षीदार तपासलेला दिसत नाही. त्यामुळे आरोपीने घटनेच्या दिवशी त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणाने सार्वजनिक रस्त्यावर चालवुन रस्त्यावरील इसमाला धडक दिली होती व त्याला जखमी केले होते ही बाब पटलावर आलेली नाही. करिता आरोपीला निर्दोष मुक्त करणे योग्य ठरते. सबब मी मुद्दा क्र. ०१ ते ०४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.०५ करिता :–**

**११.** आरोपीविरुद्ध इतर कोणतेही गुन्हे सिद्ध होत नाहीत. सबब, मी मुद्दा क्रमांक ०५ चे उत्तर नकारार्थी देत आहे. सबब, मुद्दा क्रमांक ०१ ते ०५ च्या निष्कर्षावरून अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करू शकला नसल्याने आरोपीची निर्दोष मुक्तता करणे न्यायसंगत वाटते. सबब, मी मुद्दा क्रमांक ०६ करिता खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **विजय वसंतराव काळे** याची भारतीय दंड विधान कलम २७९ व ३३७ व मोटार वाहन कायदा कलम १८१ व १३४ या कलमांखालील गुन्हयाच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जात मुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या पूर्ततेसाठी रक्कम रुपये १५,०००/– चा जातमुचलका व त्याच रकमेचा जामीन कतबा द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

RAJURKAR VIVEK VASANTRAO
Digitally signed by RAJURKAR VIVEK VASANTRAO
Date: 2026.08.20 18:36:36 +0530

दिनांक : २०/०८/२०२६

(**व्ही.व्ही. राजूरकर**)
प्र. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
वरूड, ता. वरूड जि. अमरावती.